Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR**
416 004, MAHARASHTRA
PHONE : EPABX – 2609000, www.unishivaji.ac.in
**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416 004,**
**दुरध्वनी – ईपीएबीएक्स – 2609000,**
**www.unishivaji.ac.in**

# विद्यार्थी विकास विभाग

**Phone – (0231) 2609175, 2609475**
**Email: dsw@unishivaji.ac.in**

संदर्भ क्रं. शिवाजी वि/विद्यार्थी विकास/३५ दि. ०४/०६/२०२५

प्रति,
मा. प्राचार्य /प्रमुख,
सर्व संलग्न महाविद्यालये व मान्यता प्राप्त शिक्षण, संस्था
मा. अधिविभागप्रमुख, सर्व अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषयः— सन २०२५—२०२६ या शैक्षणिक वर्षाचे अविष्कार शुल्क पाठविणेबाबत.**

महोदय,/महोदया,

उपरोक्त विषय संदर्भात, आपणांस कळविण्यात येते की, विद्यापीठामार्फत शैक्षणिक वर्ष २०२५—२०२६ पासून अविष्कार संशोधन स्पर्धा यासाठी प्रति वर्षी, प्रति विद्यार्थी रू. २०/— इतका निधी घेण्यास विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार शैक्षणिक वर्ष सन २०२५—२०२६ साठी आपल्या महाविद्यालयात/अधिविभागात प्रवेशित **प्रत्येक विद्यार्थ्यांकडून प्रति विद्यार्थी रू. २०/— इतके अविष्कार शुल्क घेण्यात यावे** व सदर जमा **होणारी रक्कम विद्यार्थ्यांच्या प्रवेशानंतर एक महिन्याच्या आत अंदाजपत्रकीय शिर्षक A.48.R.10 या खाती ऑनलाईन पद्धतीने भरण्यात यावी** ही विनंती. तसेच भरलेल्या निधीची पावती या कार्यालयास त्वरीत जमा करण्यात यावी. **याबाबत आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, सदर निधी भरणे प्रत्येक महाविद्यालयास अनिवार्य आहे.**

तसेच बऱ्याच महाविद्यालयामार्फत संपूर्ण प्रवेशित विद्यार्थ्यांचा निधी भरला जात नाही. विद्यापीठामध्ये प्रती विद्यार्थी भरलेली रक्कम व महाविद्यालयामार्फत ए.आय.एस.एच.ई (A.I.S.H.E) या पोर्टलवर नमुद केलेली विद्यार्थी संख्या यामध्ये तफावत दिसून येते. त्यामुळे ए.आय.एस.एच.ई (A.I.S.H.E) च्या पोर्टलवर नमुद केलेल्या विद्यार्थी संख्येनुसार सदर निधी जमा करावयाचा आहे.

कळावे,

आपला विश्वासू

प्र. संचालक
विद्यार्थी विकास